**सन २०१९-२० ते २०२०-२१ सर आर्थिक वर्षाच्या लेख परीक्षणास आवश्यक ते सर्व अभिलेखे लेखा परीक्षण पथकास लेखा परीक्षण वेळी सादर करणे बाबत.**

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**
**अर्थ प्रशासन विभाग**
जा. क्र. परिपत्रक/अप्रवि/अ.ले.प/लेपअभि/१०४८ /२०२४
दिनांक २३/०८/२०२४

# परिपत्रक

**संदर्भ :** जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी स्था. नि.ले. डॉ. पंदेकृवि, अकोला यांचे पत्र क्र. ५४/२०२४ दि. ०७.०८.२०२४

उपरोक्त संदभिर्य पत्रान्वये विद्यापीठ अंतर्गत वेगवेगळया कार्यालयाचे सन २०१९-२० ते २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ चे नियम ५५ नुसार व मुंबई स्था. नि.ले.प अधिनियम १९३० अन्वये जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी स्थानिक निधी लेखा परीक्षा, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या मार्फत सुरु करण्यात येणार आहे.

यास्तव विद्यापीठ अंतर्गत सर्व कार्यालय प्रमुख, आहरण व सवितरण अधिकारी, नियंत्रण अधिकारी, वेतन व लेखा अधिकारी इ. अकोला/नागपूर यांना सुचित करण्यात येते की, सन २०१९-२० ते २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या लेखा परीक्षणाच्या वेळी आवश्यक ते सर्व अभिलेखे जसे रोख पुस्तक, धनादेश नोंदवही, खर्चाची मुळ प्रमाणके, बॅंक पासबुक/स्क्रोल, महसुली उत्पन्नाचे पावत्या, साठा पुस्तक, ठेव/अग्रिम नोंदवही मासिक/वार्षीक विवरण पत्र (MES) इत्यादी महाराष्ट्र कृषि विद्यापीठ लेखासहिंता १९९१ नुसार विहित करण्यात आलेल्या KV नमुण्यातील सर्व कार्यालय निहाय आवश्यक अद्यावत नोंदवहया लेखा परीक्षण पथकास सादर करण्यात याव्या. तसेच लेखा परीक्षण दरम्यान दिलेल्या अर्धसमास पत्राचे उत्तरे देवून अनुपालन त्वरीत देण्यात यावे. तसेच लेखा परीक्षण दरम्यान निघालेल्या आक्षेपांचे अनुपालन वेळीच सादर करण्यात यावे, या बाबत दक्षता संबंधितांनी घेण्यात यावी, जेणे करून आक्षेपाची संख्या कमी होईल.

तसेच वेतन व लेखाधिकारी, अकोला/नागपूर यांनी त्यांच्याकडील मुळ प्रमाणके संबंधित कार्यालयास त्वरित देण्यात यावी. मुळ प्रमाणके उपलब्ध झाली नाही याबाबतचा आक्षेप येणार नाही यांची दक्षता घ्यावी.

सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने सर्व कार्यालयानी लेखापरीक्षणाचे गांभिर्य लक्षात घेवून त्वरीत कार्यवाही करण्यात यावी.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

**प्रत :**

१. विभाग प्रमुख (सर्व)/कार्यालयीन प्रमुख (सर्व)/ आहरण व संवितरण अधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव
२. वेतन व लेखाधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला / नागपूर माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.
३. प्राचार्य.........................................................
४. नियंत्रण अधिकारी (सर्व)
५. कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
६. प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना विद्यापीठ संकेत स्थळावर सारणाकरीता

**प्रतिलिपी:-**

१. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना मा. कुलगुरु यांच्या माहिती करीता सादर.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला